# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक ०८/०२/२०२२

**“ सामाजिक सुरक्षा विभाग यांचे पथकाने अवैधरित्या देशी-विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्याची साठवुणक करुन विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई केलेबाबत ”**

मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर प्रतिबंध करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सामाजिक सुरक्षा पथक हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध धंद्यावर कारवाई करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक ०७/०२/२०२२ रोजी चाकण पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी देशी-विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्याची साठवुणक करुन विक्री करणाऱ्या इसमांवर कारवाई करण्यात आली आहे.

सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी चाकण पोलीस स्टेशन हद्दीत पडवळ वस्ती शेलु ता.खेड जि.पुणे येथे इसम नामे गणेश पडवळ हा त्याचे रहाते घरी स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी देशी-विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्याची साठवणुक करुन तिची आजुबाजुच्या परिसरात वाहतुक करुन विक्री करतो. अशी पोलीस अंमलदार विजय कांबळे यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन सामाजिक सुरक्षा विभागाचे पथकातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी दोन-तीन दिवसापुर्वी पासुन सापळा रचुन चाकण पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ०७/०२/२०२२ रोजी १४:३० वा चे सुमारास छापा टाकुन खालील मुद्देमाल आरोपीच्या ताब्यात मिळुन आला त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

१) ४,०१,१७५/- रु किं च्या देशी-विदेशी दारुच्या व बियरच्या बाटल्या.
२) ४,१०,०००/- रु.कि.ची एक महिंद्रा बोलेरो पिकअप जु.वा.कि.अं.

-----------------------------------------------

**असा एकुण ८,११,१७५/- रु किं चा मुद्देमाल** मिळुन आला म्हणुन इसम नामे १) चंद्रकांत भिमा ओव्हाळ वय ३० वर्षे रा. मु. काळीये पो. गडद ता.खेड जि.पुणे (ड्रायव्हर) २) गणेश नंदु पडवळ वय ३८ वर्षे रा. शेलु पो. आंबेठाण ता.खेड जि.पुणे (दारु मालक) तसेच पाहिजे आरोपी नामे शेफ वे वाईन्सचा चालक मालक पुर्ण नाव पत्ता माहित नाही याने त्याचे वाईन्स मधुन इसम नामे चंद्रकांत ओव्हाळ व गणेश पडवळ यांना अनुज्ञप्तीच्या अटी शर्तीचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात दारुची विक्री केली म्हणुन त्यांचे विरुध्द चाकण पोलीस स्टेशन येथे गुरनं १८६/२०२२ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई),८२, ८३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास चाकण पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. काकासाहेब डोळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. श्री. प्रशांत अमृतकर, वपोनि श्री. देवेंद्र चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागातील पोउपनि श्री. प्रदिपसिंग सिसोदे, पोउपनि धैर्यशिल सोळंके पोलीस अंमलदार विजय कांबळे, किशोर पढेर, सुनिल शिरसाट, नितीन लोंढे, भगवंता मुठे, अमोल साडेकर, मारुती करचुंडे,राजेश कोकाटे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, अतुल लोखंडे, योगेश तिडके, अमोल शिंदे, सुमित डमाळ यांनी केली आहे.


पॉवर
देशी दारू